# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त

नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३८

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १०/१०/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ७. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ९. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| १०. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १२. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १३. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १९. | श्री उमेश पाटील | नगररचना विभाग |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २४. | श्री गणेश सुर्यवंशी | लिपीक शिक्षण मंडळ |
| २५. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २६. | श्री महेंद्र ठाकरे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २८. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २९. | गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६०५ स्वच्छता हि सेवा-२०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु. स्व.निरीक्षक शासन निर्देशानुसार दि.१७/९/२०२५ ते दि.२/१०/२०२५ पर्यंत सेवा पंधरवाडा राबविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व स्वच्छता मोहिम घेतल्या आहेत. झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८३ दिनांक १०/१०/२०२५**

दिनांक २ ऑक्टोंबर २०२५ हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्व तयारी म्हणून दि. १७/९/२०२५ ते दि. २/१०/२०२५ या कालावधीमध्ये स्वच्छता ही सेवा पंधरवडा हा कार्यक्रम आयोजित करणेत आलेला आहे. करीता स्वच्छता हि सेवा (SHS) हे अभियान राबविणेत येणार आहे. त्यानुसार सविस्तर आराखडा तयार करण्यात आला असुन त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

उक्त् अभियान अंतर्गत प्रस्तावात नमूद १ ते ९ कामे व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत विविध कामे (पंचतत्व शिल्प तायार करणे रंगरगोटी इ. अनुषंगीक कामे) आरोग्य (स्वच्छता) विभागामार्फत घेण्यात आलेली आहे.

उक्त कार्यक्रम वेळेवर करुन घेणे आवश्यक असल्याने तातडीची बाब पहाता श्री.इसाक शब्बीर शेख,धुळे यांच्याकडुन दिनांक १७/९/२०२५ रोजी अभियाना शुभारंभ कार्यक्रम आयोजीत करुन घेण्यात आला आहे व तसेच उर्वरीत कार्यक्रम आयोजीत करणे, आवश्यक साहित्यांचा पुरवठा करणे बाबत बाजार भावानुसार इसाक शब्बीर शेख काम करण्यास तयार आहे. त्यानुसार त्यांच्याकडुन वरील प्रमाणे कामे करुन घेण्यात आलेले आहेत.

शासन निर्देशानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत माहिती, शिक्षणप्रचार, प्रसार व वर्तणुकीतील बदल (IEC and BC) कामी प्राप्त निधीचा विनियोग करणे बाबत सुचित केले आहे.

सध्या स्थितीत मनपा आरोग्य विभागामार्फत रंगकाम वगळून माहिती, शिक्षणप्रचार, प्रसार व वर्तणुकीतील बदल (IEC and BC) कामाकरिता ई-निविदा क्र.१४६ सन २०२४-२५ प्रसिध्द करण्यात आली असुन त्यासाठी रु.७०,००,०००/- (रुपये सत्तर लक्ष मात्र) इतकी प्र.मा.आदेश घेण्यात आला असुन काम सुरु आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत जनजागृतीपर संदेश रंगविण्याकामी रु.१५,००,०००/- (रुपये पंधरा लक्ष मात्र) इतक्या रक्कमेची ई-निविदा प्रक्रियेद्वारे काम देण्यात आले असुन प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

वरील दोन्ही कामे वगळता रु.९७,७५,८४६/- मधुन रु.१२,७५,८४६/- इतकी रक्कम शिल्ल्क असुन वर नमुद कामे हे स्वच्छता हि सेवा-२०२५ अंतर्गत नागरीकांमध्ये जनजागृती व वर्तवणुकीतील बदल या घटकांतर्गत असल्याने उक्तकामी होणारा खर्च भागविता येवु शकतो.

त्याअनुषंगाने तातडीची बाब पहाता स्वच्छता हि सेवा-२०२५ अंतर्गत उक्त कामे श्री.इसाक शब्बीर शेख,धुळे यांच्याकडुन करुन घेण्यास व येणारा खर्च रुपये १२,७५,०००/- मात्रला मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्ताव लक्षात घेता, स्वच्छता हि सेवा-२०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या झालेला खर्च रक्कम रुपये १२,७५,०००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व

२ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६०६ हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे वाहतुक केल्याने झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.वृक्ष वि. प्रमुख धुळे मनपा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे लागवडीचे उददीष्ट पुर्ण करणेकरीता वन विभागाच्या धुळे तालुक्यातील बोरविहीर तसेच शिंदखेडा तालुक्यातील लामकानी येथुन एक लक्ष रोपे वाहतुक करणे आवश्यक होते. सदरचे काम हर्षल एन्टरप्रायझेस ॲण्ड मल्टीसर्व्हीसेस यांच्याकडुन करुन घेण्यात आलेले आहे. झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८४ दिनांक १०/१०/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण करणेकरीता वनविभागाच्या धुळे तालुक्यातील बोरविहीर तसेच शिंदखेडा तालुक्यातील लामकानी येथून एक लक्ष रोपे वाहतुक करणे आवश्यक होते. म. आयुक्त सो यांनी मान्य केलेल्या कार्यालयीन टिपणी नुसार एक लक्ष रोपांची वाहतुक केलेली आहे. सदर वाहतुकीचे काम हर्षल इंटरप्राईजेस ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांना देण्यात आले होते. काम झाल्याने हर्षल इंटरप्राईजेस ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे सदर कामाचे बिल त्यांनी सर्व खर्चासह प्रस्तावात नमूद तपशीलासह रुपये **१४,६३,२००/- मात्र** जी.एस.टी खर्चासह सादर केले आहे.

तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने संचालक, हर्षल इंटरप्राईजेस ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांचा मागील अनुभव पाहता काम करणेसाठी नियुक्ती आदेश देणे गरजेचे आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता मिळणेस स्थायी समितीपुढे विषय सादर झाला आहे

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे वाहतुक केल्याने झालेला खर्च रुपये १४,६३,२००/- मात्र जी.एस.टी खर्चासह मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६०७ श्री गणेशोत्सव आगमन व विसर्जनानिमित्त मिरवणूक मार्गावरील वृक्षांचा विस्तार कमी करण्याकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.वृक्ष वि. प्रमुख श्री गणेश आगमन व श्री गणेश विसर्जन कालावधीत भक्तांकडुन मोठया संख्येने मिरवणुका काढल्या जातात. या मिरवणुकांना वृक्षांच्या फांद्यांचा अडथळा ठरु नये म्हणुन संपुर्ण शहरातील वृक्षांच्या फांद्यांचा विस्तार कमी करावा असे आदेश होते. हे काम १० ते १२ दिवस चालले. ४४२ गणेश मंडळे होते बऱ्याच जणांच्या तक्रारी होत्या. झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक अजुन काही ठिकाणी झाडांच्या फांद्यांमुळे दिव्यांचा प्रकाश रस्त्यावर पडत नाही अशा ठिकाणी ही कामे सुरु ठेवावी. तसेच फांद्या रस्त्यांवर न टाकता त्याची विल्हेवाट लावावी. तसेच जिथे जिथे बांधकामे चालु आहे. त्यांनी रस्त्यावर साहित्य ठेवले आहे अशा लोकांकडुन दंडात्मक पावती फाडावी. दंड वसुल करण्यात यावा. या गोष्टींमुळे अपघात होण्याची शक्यता जास्त असते. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८५ दिनांक १०/१०/२०२५**

श्री गणेश आगमन व श्री गणेश विसर्जन कालावधीमध्ये भक्तांकडून मोठया संख्येने मिरवणुका काढल्या जातात, या मिरवणुकींना वृक्षांच्या फांदयांचा अडथळा ठरु नये म्हणून संपुर्ण शहरातील वृक्षाच्या फांदयांचा तात्काळ विस्तार कमी करण्यात यावा असे आदेश होते. सदर आदेशानुसार वृक्षांचे विस्तार कमी करण्याचे काम अनुष्का मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांना देण्यात आले होते. मुदतीत काम केल्याने कामाचे बिल खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

महापालिका हद्दीत ठिकठिकाणी वृक्षांचा फांदयांचा विस्तार कमी करण्याची कार्यवाही करावयाची आहे. परंतु मनपा कर्मचाऱ्यांना कुठलाही अनुभव नसल्याने अनुभवी व्यक्तीकडुन हे काम करुन घ्यावे व करण्यात येणाऱ्या साहित्याची आवश्यकता, निकड व कालावधी इ. विचारात घेता सदरची सेवा तातडीने दयावयाची आहे. एकूण २४४ वृक्ष विस्तार कमी केलेला असून प्रति वृक्ष ९५०/- मात्र प्रमाणे एकूण **२,३१,८००/- मात्र** देयक सादर केलेले आहे.

तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने संचालक अनुष्का मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांचेमार्फत करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार श्री गणेशोत्सव आगमन व विसर्जनानिमित्त मिरवणूक मार्गावरील वृक्षांचा विस्तार कमी करण्याकामी झालेला खर्च एकूण **२,३१,८००/- मात्रला** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६०८ मनपा शिक्षण मंडळाकडील सद्यस्थिती कार्यरत बालवाडी शिक्षीका व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक मनपा शिक्षण मंडळाकडील सद्यस्थितीत कार्यरत बालवाडी शिक्षीका व मदतनीस यांना, शिक्षीका यांना रु. ८०००/- व मदतनीस यांना रु. ४२५०/- इतके मानधन मिळत आहे. त्यांनी प्रशासनाकडे मानधन वाढीसाठी मागणी केली आहे. याबाबत मा. आयुक्त सो. यांनी उक्त मानधनावरील शिक्षीका यांना रु. ८०००/- वरुन रु.१००००/- व मदतनीस यांना रु. ४२५०/-

वरुन रु. ७०००/- याप्रकारे वाढ करणेस शिफारस केलेली आहे. सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक मानधन वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच शाळा नं. ९ चा विषय आहे तेथील शिक्षकांचा मुदतवाढीचा आदेश अद्याप दिलेले नाही. तुम्हाला मुदतवाढ देण्यास काय प्रॉब्लेम आहे. तसेच त्यांचे एप्रिल महिन्यापासुन पगार थकीत आहे.

मा.शि. मंडळ लिपीक प्रशासन अधिकारी त्यांच्या टिपण्यांवर सहया करीत नाहीत. पगाराची टिपणी ठेवली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्रशासन अधिकारी स्थायी समिती व महासभांना गैरहजर असतात. शिक्षण मंडळाचे बजेट देखील मनपा मान्य करते. तो मनपाचा विभाग म्हणुन कार्यरत आहे. प्रशासन अधिकारी बैठकांना उपस्थित रहाणे आवश्यक आहे. त्यांची तात्काळ बदलीबाबतचा प्रस्ताव आस्थापना विभागाने ठेवावा. व ता तात्काळ आदेश डेप्युटी डायरेक्टर शिक्षण विभाग, नाशिक यांना पाठविण्यात यावा. ठरावाच्या कॉपीसहित बदलीचा प्रस्ताव उपायुक्तांच्या सहिने पाठवावे. शिक्षकांच्या मुदतवाढीच ठराव डिसेंबर २०२४ मध्ये झालेला असुन त्यावर त्यांच्या ऑर्डर केलेल्या नाही. तसेच एप्रिल महिन्यापासुन शिक्षीकांचा पगार थकीत आहे. बैठकांना का हजर राहिला नाहीत याबाबत खुलासाची नोटीस प्रशासन अधिकारी यांना देण्यात यावी. तसेच त्यांच्या बदलीबाबत तात्काळ प्रस्ताव डेप्युटी डायरेक्टर शिक्षण विभाग, नाशिक यांचेकडे पाठवावा. तसेच येथुन पुढे शिक्षीका मानधनाबाबत आदेश आस्थापना विभागाकडुन देण्यात यावा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८६ दिनांक १०/१०/२०२५**

मनपा शिक्षण मंडळाकडील सद्यस्थिती कार्यरत श्रीमती वर्षा शिवाजी पाटील वगैरे बालवाडी शिक्षीका व मदतनीस हे तत्कालीन नगरपालिकेत मानधनावर कार्यरत आहेत. त्यांना त्यांचे कामाचे स्वरुप व वेळेनुसार मनपा शिक्षण मंडळ व शासन निर्णयानुसार दरमहा बालवाडी शिक्षीका यानुसार प्रति शिक्षीका रु. ८०००/- व मद तनीस रु. ४२५०/- इतके मानधन मिळत आहे धुळे मनपाच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या इतर शिक्षीका यांना रु. १५०००/- व मदतनीस यांना रु. ११२५०/- मात्र मानधन दिले जात आहे.एकाच पदावर कार्यरत कर्मचारी यांना दोन वेगवेगळे मानधन दिले जात आहे व १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याकारणाने आमच्या मानधनात वाढ करण्यात यावी याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

तरी तत्कालीन नगरपरिषदेद्वारे नियुक्ती करण्यात आलेल्या मानधनावरील शिक्षीका व मदतनीस खालील प्रमाणे कार्यरत आहेत.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | सध्याचे मानधन | अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | सध्याचे मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्षा शिवाजी पाटील | शिक्षीका | ८०००/- | ७ | अफजलजुनिसा | शिक्षीका | ८०००/ |
| २ | संगिता रविंद्र माळी | शिक्षीका | ८०००/ | ८ | सुरेखा अर्जुन माळी | शिक्षीका | ८०००/ |
| ३ | आशा अशोक बोरसे | शिक्षीका | ८०००/ | ९ | जुबेदा बी मो उस्मान | शिक्षीका | ८०००/- |
| ४ | पुजा दिपक पगार | शिक्षीका | ८०००/ | १० | मिनाक्षी एकनाथ् चौधरी | मदतनीस | ४२५०/- |
| ५ | सविता मोरे | शिक्षीका | ८०००/ | ११ | मिरा रामचंद्र कुलेवार | मदतनीस | ४२५०/ |
| ६ | साजेदा बानो | शिक्षीका | ८०००/ | १२ | कौसर जहा पठाण | मदतनीस | ४२५०/ |

शासन निर्णयानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे मानधनामध्ये वाढ करणेबाबत व त्यांना प्रोत्साहन भत्ता लागु करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार मा. उपायुक्त सो. यांनी उक्त मानधनावरील शिक्षीका व मदतनीस यांच्या मानधनात मानधन वाढ लागु करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, मनपा शिक्षण मंडळाकडील सद्यस्थिती कार्यरत प्रस्तावात नमूद एकूण १ ते १२ बालवाडी शिक्षीका यांच्या मानधनात रु ८०००/- वरुन रु १००००/- व मदतनीस यांना रु. ४२५०/- वरुन रु. ७०००/- मात्र वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपा शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी श्री विश्वंभर दासरवाड वारंवार मे. स्थायी समिती व मे. महासभेच्या बैठकीस अनुपस्थित आहे. तसेच आदेशीत करुन देखील शाळा नं. ९ इंग्रजी माध्यमांच्या शिक्षीकांचा मानधनावरील नियुक्तीचा प्रस्तावाबाबत अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सदर बाब ही कार्यालयीन शिस्ती विरुध्द व बेजबाबदारपणाची आहे. शिक्षण मंडळ हे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विभाग आहे. तथापी प्रशासन अधिकारी यांचा समन्वय नसल्याने कामकाजात वेळोवेळी अडचणी निर्माण झालेल्या आहे. त्यांची कार्यपध्दती व कार्यप्रणाली लक्षात घेता श्री विश्वंभर दासरवाड यांना त्यांच्या मुळ आस्थापनेवर वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव तातडीने मा. उपसंचालक शिक्षण नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस सादर करावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६०९ धुळे मनपा क्षेत्रात घरोघरी निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतुक करणे तसेच गटारी व नाल्यांतील घाण संकलन करणे व घनकचरा कामाची देखरेख आणि देखरेखीसाठी पात्र मनुष्यबळ प्रदान करणे पुर्ण करणे याकामासाठी दोन वर्ष मुदतीकरता निविदा दर मागविण्यात आलेत त्यावरील आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त सद्यस्थितीत कचऱ्याचे वाहतुक, संकलन व प्रक्रिया या ३ गोष्टी आहेत. त्यात ११ गावे हददवाढीची नव्याने समावेशीत झाली. परंतु जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे घंटागाडयांचे जे पुर्वी होते तेच आहे. त्यामुळे घनकचरा संकलनासाठी जास्तीचे प्रयत्न करावे लागतात. परंतु तेवढी यंत्रणा आपल्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे आपण हे एस्टीमेट तयार केले आहे. त्यात शहरातील प्रत्येक प्रभागात ५ घंटागाडया असतीलव हददवाढ समावेशीत ११ गावे आहे. तसेच डिझेलचे रेट वाढले आहे. तसेच बेसिक मिनीमम वेजेस आहे त्यात वाढ झालेली आहे. या गोष्टींचा विचार करुन हे एस्टीमेट तयार केले आहे. याची तांत्रिक मान्यता देखील झालेली आहे. यापुर्वी घनकचरा संकलन,वाहतुक व डंपिंग याच गोष्टी होत्या. नविन एस्टीमेट मध्ये डेपोवरील लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर आहे, पोकलेन असो, टॅक्टर सर्वच गोष्टींचा समावेश केला आहे. हे जर आपण केले तर या व्यतिरीक्त कुठलिही नविन यंत्रणेची गरज भासणार नाही. तसेच बेसिक विषय आहे. मिनीमम वेजेसचा तो देखील यात स्लॅब होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ऐन सणासुदीच्या दिवसात संप करणे हे चुकीचे आहे. नाहक अडवणुक होते.एवढे पैसे देवुन पण व्यवस्था सुधारत नाही. हे नविन टेंडर किती दिवसाचे आहे.

मा.उपायुक्त हे दोन वर्षासाठी काढतोय.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात एक अट टाकावी की ही माणसे आहे ती पुन्हा त्याच सिस्टीममध्ये येता कामा नये. अडवणुक करणारी व ब्लॅकमेल करणारी यंत्रणा यात नसली पाहिजे.

मा.उपायुक्त याबाबत आपण त्यांना अट देखील घातली की, मनपाचा बिलावर अवलंबुन न रहाता कमीत कमी चार महिने स्वत:चा खर्च करता यावा.

मा.आयुक्त तथा प्रशासक ४ महिने नाही ६ महिने कारण पैसेच येणार नाही. १५ व्या वित्त आयोगाचे पैसे तुम्ही खर्च करीत आहात. २ वर्षे झाली १ रुपयादेखील १५ व्या वित्त आयोगात शिल्लक नाही. हे टेंडर एक वर्षासाठी करावे. नविन बॉडी येणार तेव्हा त्यात निर्णय होईल. तसेच त्यात एक अट टाकावी की, इलेक्शन नंतर १५ व्या वित्त आयोगातील पैस जेव्हा उपलब्ध होईल तेव्हाच बिले दिली जातील तोपर्यंत तुम्ही करण्यास तयार असाल तर करावे. तसेच त्यांच्याशी एक बैठक घेण्यात यावी. तसेच नविन ठेका देतांना जेव्ढया गाडया स्वयंभुवाल्याकडे आहे. तेवढया दुरुस्त करुन घ्याव्या, तोपर्यंत त्याचे डिपॉझिट व इतर बिले देता कामा नये.

मा.उपायुक्त ठेका देतांना आरटीओचे फिटनेस सर्टीफिकेट घेवुन गाडया ताब्यात आल्यानंतरच पुढील प्रोसिजर करण्यात येईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८७ दिनांक १०/१०/२०२५**

धुळे महानगरपालिका क्षेत्रातील घरोघरी निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतूक करणे व गटारे आणि नाल्यातील गाळ संकलन करणे व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर देखरेख आणि देखरेखीसाठी पात्र मनुष्यबळ प्रदान करण्याकामी उक्त ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदेत खालील प्रमाणे अंदाजे २३० मे.टन कचरा प्रती दिवस ग्राह्य धरुन अंदाजपत्रकीय रक्कम (Estimate Rate) रु.३६,५०,५१,१२४/- दोन वर्ष कालावधी करीता दर्शविण्यात आली होती. सदर अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार प्रती दिवस खर्च रु.४,९५,११८/- इतका आहे.

उक्त निविदेची Commercial Bid व्यापारी लिफाफा उघडण्याची प्रक्रीया पूर्ण झालेली असून निविदेत एकूण ३ निविदा धारकांनी भाग घेतलेला आहे. सदर ई-निविदेत विहीत प्रकीये नंतर सर्वात कमी L१ निविदाधारक मे. भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांचे दर **एकुण दर रु.९,२९२/-** दर प्राप्त झाले होते. सदर दर जास्तीचे वाटत असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटी करीता बोलविण्यात आले होते.भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांनी ई-मेलद्वारे प्रस्तावात नमूद कामासाठी एकूण दर रुपये ९२३०/- मात्र सादर केलेले आहेत. ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | सादर केलेले दर | अंदाजपत्रकीय दर |
|---|---|---|---|---|
| L-१ | भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. | धुळे शहर व ११ हद्दवाढ गावातील (१०१.०६ चौ.कि.मी.) क्षेत्रातील दैनंदिन घराघरातुन तसेच रहिवासी क्षेत्र, उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उद्याने इ. ठिकाणाचा निर्माण होणारा वर्गीकृत (ओला व सुका) कचरा संकलन करुन घंटागाडीद्वारे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पापर्यंत वाहतुक करणे, डेपोवर वजन करणे, डेपोवर उपसा करणे | २५९० | २३०० |
| | | धुळे शहर व ११ हद्दवाढ गावातील (१०१.०६ चौ.कि.मी.) क्षेत्रातील रहिवासी क्षेत्र, उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उद्याने इ. ठिकाणाचा निर्माण होणारा (Black Spot) मिश्र कचरा संकलन करुन | २५९० | १७५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पापर्यंत वाहतुक करणे, डेपोवर वजन करणे, डेपोवर उपसा करणे | | |
| | | शहरतील रस्त्यावरील कचरा/माती, गटारेतील काढण्यात आलेला गाळ, C&D Waste तसेच नाले सफाईतुन निघालेला गाळ कंपोस्ट डेपो (landfill) पर्यंत ट्रक्टर द्वारे वाहतुक करणे, डेपोवर वजन करणे, डेपोवर उपसा करणे | १८५० | १८०० |
| | | घनकचरा प्रकल्पावर तसेच कंपोस्ट डेपोवर पोकलैन मशिन पुरविणे. (ड्रायव्हर, भत्ता व डिझेल सह) बाबत | २२०० | २२०० |
| **एकुण :-** | | | **९२३०** | **८०५०** |

भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांचे उक्तकामी वाटाघाटीअंती एकुण दर रु.९२३०/- मात्र सादर केलेले होते. तसेच वरील प्राप्त दरांनुसार प्रती दिवस खर्च रु.५,६१,५००/- इतका होत आहे.

तथापी सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरानुसार एकूण दर ८०५० मात्र (४,९५,११८/- प्रति दिवस खर्च) दर मंजूर करणेबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी शिफारस केली आहे.

त्याअनुषंगाने उक्त ई-निविदेत अंदाजपत्रकीय दरानुसार दरमंजूरीबाबत मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा क्षेत्रात घरोघरी निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतुक करणे तसेच गटारी व नाल्यांतील घाण संकलन करणे व घनकचरा कामाची देखरेख आणि देखरेखीसाठी पात्र मनुष्यबळ प्रदान करणे पुर्ण करणे याकामासाठी वाटाघाटी अंती प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय एकूण दर रुपये ८०५०/- मात्रला (४,९५,११८/- प्रति दिवस खर्च)पुढील १ वर्ष कालावधीसाठी मान्यता देणेत येत आहे. काम समाधानकारक असल्यास मे. महासभेच्या मान्यतेने पुढील १ वर्ष मुदतवाढ देणेत यावी.

सदर संस्थेकडून आवश्यक त्या अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधी उपलब्धतेनंतर संबंधीत संस्थेचे देयके अदा करणेबाबत अटी शर्तीत नमूद करण्यात यावे. वाहन विभागामार्फत पूर्वी नियुक्त संस्थेकडून मनपामार्फत दिलेले वाहने (घंटागाडी, जे.सी.बी. इ.) दुरुस्ती करुन महाराष्ट्र प्रदेशिक परिवहन कार्यालयाकडून प्रमाणित करुन ताब्यात घेणेत यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**